# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३२७ - २३** **दिनांक : - २१/०९/२०२३**

## दुखापत करुन जबरी चोरी करणारा आरोपी अटक
## नवघर पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

नवघर पोलीस ठाणे नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री विकास मानसिंग जग्गी, वय-३३ वर्षे, व्यवसास-नोकरी, रा.डी/५०१, सोनम दर्शन बिल्डींग, गोल्डन नेस्ट, फेज-१, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे यांनी समक्ष पोलीस ठाण्यात येवुन खबर दिली की, दि.१९/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा.चे सुमारास त्यांची आजी नामे सवित्री ध्यानसिंग ठाकुर, वय-८२ वर्षे,रा.ए/२०४, श्वेता पार्क, आर.एम.पी.पार्क, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे या त्यांचे राहते घरी येथे एकट्या असल्याचा फायदा घेवुन कोणीतरी अनोळखी इसमाने त्यांना इच्छापुर्वक दुखापत करुन जबरीने तिच्या त्यांचे अंगावरील एकुण-३,२१,०००/- रुपये किंमतीच्या वस्तु जबरीने चोरी करुन घेवुन गेलेबाबत फिर्यादी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५८८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम-३९४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने त्याची माहीती मा.वरिष्ठांना देवुन त्यांचा मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु केला व प्रथम गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट दिली. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर घटनास्थळ व घटनास्थळाच्या आजुबाजुचे सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासुन गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांनी वर्णन केलेल्या माहितीच्या अनुशंगाने जखमी साक्षीदार यांच्या इमारतीमधील वॉचमन हा घटनेपासुन जागेवर उपस्थित नसल्याचे अढळुन आले तसेच त्याचा त्याचे राहते घरी शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. त्यावरुन सदर इसमाचा राहते परिसरात शोध घेत असतांना सदरचा इसम सालासर हनुमान मंदिराजवळील टर्फ येथे संशयास्पदरित्या वावरत असतांना मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव/पत्ता- राजेंद्र बहादुर कुंवर, वय-४२ वर्षे, व्यवसाय-वॉचमन, ए/३१२, पियुश अपार्टमेंट, आर.एन.पी.पार्क, काशिविश्वनाथ मंदिरासमोर, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे मुळ रा. शेतीहंचल, जि.आछाम, बैलपाटा, देश-नेपाळ असे असल्याचे सांगितले. तसेच सदर आरोपी याचा नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात दि.२०/०९/२०२३ रोजी ००.५९ वा. सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपी याचाकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास करुन त्याचा कडुन जबरीने घेवुन गेलेला एकुन-३,२१,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/संदिप पालवे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.उमेश माने-पाटील, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पो.नि.सुशिलकुमार शिंदे (गुन्हे) स.पो.नि. संदिप पालवे, पो.उप.निरी. ज्ञानेश्वर आसबे,पो.हवा. संतोष पाटील, भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अं. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत,विनोद जाधव यांनी केलेली आहे.

**----0000----**